ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४ वा | दिनांक : १०/१०/२०२४ | वार : गुरूवार

# दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे घर सील ; सामानही बाहेर काढले





**दिल्ली** : दिल्लीचे मुख्यमंत्री आतिशी यांचे फ्लॅग स्टाफ रोडवरील सीएम निवासस्थान सील करण्यात आले आहे. पीडब्ल्यूडीने त्यांचे सामान निवासस्थानातून काढून टाकले आहे. वास्तविक, माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी ४ ऑक्टोबर रोजी घर रिकामे केले होते. आतिशी दोनच दिवसांपूर्वी त्यात राहायला आल्या होत्या.

बुधवारी सकाळी ११-११:३० वाजता पीडब्ल्यूडीचे अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी आले. त्यांच्या म्हणण्यानुसार घराचा ताबा देताना नियम पाळले गेले नाहीत. आतिशी यांच्याकडे या घराच्या चाव्या होत्या, मात्र त्यांना घर वाटपाची अधिकृत कागदपत्रे देण्यात आली नव्हती. अधिकाऱ्यांनी दुपारपर्यंत घराच्या चाव्या घेतल्या.

याबाबत मुख्यमंत्री कार्यालयाने सांगितले की, 'इतिहासात प्रथमच मुख्यमंत्र्यांना घर सोडण्यास सांगण्यात आले आहे. भाजपच्या सांगण्यावरून एलजींनी सीएम आतिशी यांच्या घरातून बळजबरीने सामान बाहेर काढले. हे मुख्यमंत्री निवासस्थान भाजपच्या एका बड्या नेत्याला देण्याची तयारी सुरू आहे. भाजप २७ वर्षांपासून दिल्लीतील सरकारमधून बाहेर आहे, आता त्यांना मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान बळकावायचे आहे.

दक्षता संचालकांनी केजरीवाल यांच्या विशेष सचिवासह तीन अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे. आणखी दोन अधिकारी असे आहेत जे केजरीवाल मुख्यमंत्री असताना सीएम कॅम्प ऑफिसमध्ये तैनात होते. स्पष्ट निर्देश देऊनही त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाच्या चाव्या पीडब्ल्यूडीला का दिल्या नाहीत, असा सवालही त्यांना विचारण्यात आला आहे. या अधिकाऱ्यांना सात दिवसांत उत्तर दाखल करण्यास सांगण्यात आले आहे.

याप्रकरणी दिल्ली भाजप अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा म्हणाले की, 'अरविंद केजरीवाल यांच्या शीश महलला अखेर सील करण्यात आले आहे... त्या बंगल्यात कोणते रहस्य दडले आहे की संबंधित विभागाला चाव्या न देता तुम्ही बंगल्यात पुन्हा घुसण्याचा प्रयत्न करत आहात?'

ते पुढे म्हणाले- 'तुमचे सामान दोन छोट्या ट्रकमध्ये घेऊन तुम्ही चांगले नाटक केले. बंगला अजूनही तुमच्या ताब्यात आहे हे सर्वांना माहीत आहे. तुम्ही ज्या प्रकारे बंगला आतिशींना देण्याचा प्रयत्न केला तो घटनाबाह्य होता. आतिशींना आधीच बंगला मिळाला आहे, मग त्या तुमचा बंगला कसा घेतील? त्या बंगल्यात अनेक गुपिते दडलेली आहेत.

अरविंद केजरीवाल ४ ऑक्टोबर रोजी दुपारी लुटियन्स दिल्लीतील फिरोजशाह रोडवरील बंगला क्रमांक ५ मध्ये स्थलांतरित झाले. हा बंगला 'आप'चे पंजाबमधील राज्यसभा खासदार अशोक मित्तल यांना देण्यात आला आहे.

केजरीवाल त्यांची पत्नी सुनीता केजरीवाल, आई-वडील आणि दोन्ही मुलांसह स्थलांतरित झाले आहेत. अशोक मित्तल आणि त्यांच्या पत्नीने सर्वांचे त्यांच्या घरी स्वागत केले. मित्तल यांनी एएनआय या वृत्तसंस्थेला सांगितले की, केजरीवाल माझ्या घरी पाहुणे म्हणून शिफ्ट झाले आहेत.

केजरीवाल यांनी १७ सप्टेंबर रोजी दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्यांनी मुख्यमंत्री निवास आणि सर्व सरकारी सुविधा सोडण्याची घोषणा केली होती. केजरीवाल नवीन घराच्या शोधात असल्याचे आपने म्हटले होते. ते अशी जागा शोधत आहेत जिथे राहण्यात कोणताही वाद नाही.

राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख या नात्याने केजरीवाल यांना निवासाची व्यवस्था करण्याची मागणी केंद्र सरकारकडे करण्यात आली होती, परंतु त्यावर सरकारकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, असा आरोप आपने केला होता.



**भारतीय विद्यार्थी सेनेचे विद्यापीठ प्रमुख डॉ. तुकाराम सराफ यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना मोनुज रेस्टॉरंटचे संचालक मुजीब खान, सोबत डॉ. धनंजय वडमारे, डॉ. किशोर सूर्यवंशी, डॉ. नामदेव कचरे, महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे आणि महाराष्ट्र जनशक्ती न्युजचे मुख्य संपादक प्राचार्य डॉ. हसन इनामदार दिसत आहेत.**

## मनोज जरांगेंविरोधात आक्षेपार्ह पोस्ट: कार्यकर्त्यांची रुग्णालयात शिरून डॉक्टरवर शाईफेक

**नाशिक** : मराठा समजाच्या अरक्षणसाठी लढा देणारे मनोज जरांगे यांच्याविरोधात पोस्ट लिहिली म्हणून नाशिक येथील एका डॉक्टरवर संभाजी ब्रिगेडकडून शाईफेक करण्यात आल्याची घटना घडली आहे. संतप्त संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करत क्लिनिकमध्ये जात डॉक्टरवर शाई अक्षरशः ओतली आहे. डॉ. विजय गवळी असे या डॉक्टरचे नाव आहे.

मनोज जरांगे पाटील यांचे सगेसोयरे मुसलमान असल्याची पोस्ट संबंधित डॉक्टरने केली असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडकडून करण्यात आला आहे. तसेच आम्हाला तुमचा अपमान करायचा नाही, तुम्ही आमच्यासाठी वडीलधारी आहात. आमच्या भावना तीव्र असून जगण्या-मरण्याची लढाई आम्ही लढत आहोत, असे संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. विजय गवळी यांना म्हणले आहे.

संभाजी ब्रिगेड आक्रमक झाल्यावर डॉ. विजय गवळी यांनी माफी देखील मागितली आहे. याचा व्हिडिओ देखील समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. डॉ. विजय गवळी म्हणाले, मीसुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांचा मावळा आहे. माझ्याकडून चूक झाली असून त्यासाठी क्षमस्व. माझ्याकडून अनावधानाने मनोज जरांगे पाटील यांचा अवमान करणारी पोस्ट पाठवली गेली आहे. त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

दरम्यान, दोन दिवसांआधी ओबीसी नेत्यांच्या घरावर संभाजी ब्रिगेड आणि मराठा आंदोलक धावून गेले होते. मनोज जरांगेंच्या विरोधात कोणीही बोलण्याची हिम्मत करू नये अन्यथा अशा प्रकारे उत्तर दिले जाईल हे दाखवण्याचा प्रयत्न संभाजी ब्रिगेडने केला आहे.

मनोज जरांगे पाटील आता नारायण गडावर दसरा मेळावा घेणार आहेत. निवडणूक लागण्याच्या आत सरकारने आरक्षण दिले तर ठीक नाही तर भाजपचे आमदार पाडणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. नारायण गडावर होणाऱ्या दसरा मेळाव्यामध्ये आगामी विधानसभा निवडणुकीत उमेदवार द्यायचे की पाडायचे याबाबतच निर्णय देखील घेण्यात येणार आहे.